# नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-**

१) या कार्यालयाच्या दक्षता शाखेकडून दिनांक २२/०३/२०१३ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२०/२०१३/जा.२६७, दिनांक २६/०३/२०१३.

३) उपनियंत्रक शिधावाटप, ग परिमंडळ, कांदिवली यांचेकडून दिनांक ०६/०४/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अहवाल.

४) मे. शिवराज ऑईल्स प्रा. लि. चे संचालक यांचे दिनांक ०९/०४/२०१३ रोजीचे निवेदन.

५) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, बोरीवली पोलिस ठाणे, मुंबई यांचे दिनांक १५/०४/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.२०/२०१३/जा. ४५२
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : २०/०५/२०१३.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

## आ दे श

(जीवनविश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक १२/०३/२०१३ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार, उपनियंत्रक शिधावाटप, ग परिमंडळ, कांदिवली यांचे अधिपत्याखालील अधिकारी/कर्मचारी पंचांसह दुपारी सुमारे १.५० वाजता मे. शिवराज ऑईल्स प्रा. लि., सी.टी.एस.क्र. ३७४/बी-१८, सत्यसाई कॉम्प्लेक्स जवळ, पद्मा नगर, चिकुंवाडी, बोरीवली (प), मुंबई ४०० ०९२ या पत्त्यावर पोहचले. सदर पत्त्यावरील मे. शिवराज ऑईल्स प्रा. लि. यांच्या कार्यालयीन गाळ्यात प्रवेश केला असता तेथे उपस्थित असलेल्या व्यक्तिस अधिकाऱ्यांनी त्यांची ओळख करुन दिली व भेटीचे प्रयोजन सांगुन झडतीच्या कामी सहकार्य करण्याची विनंती केली. त्यानुसार त्या इसमांनी संपूर्ण सहकार्य देण्याचे आश्वासन दिले. अधिकाऱ्यांनी सदर इसमांस त्याचे नाव गाव व पद विचारले असता, त्यांनी

त्यांची नावे निपमभाई बी. शाह, व चिराग एन. पटेल असे सांगुन ते संचालक असल्याचे सांगितले. तद्नंतर अधिकाऱ्यांनी सांगितल्यानसुार त्यांनी त्यांच्या आस्थापनेतील कर्मचारी प्रत्यक्ष साठा मोजण्यास अधिकाऱ्यांसोबत दिले. त्यांच्यासह काही कर्मचारी साठा मोजण्याच्या कामी आस्थापनेस जोडून असलेल्या गोदामात तसेच तळघरात असलेल्या गोदामात गेले व साठा मोजण्याच्या कामास सुरुवात केली.

दरम्यान अधिकाऱ्यांनी निपमभाई बी. शाह, संचालक यांचेकडे आस्थापनेचे कागदपत्रे मागुन पंचांसमक्ष तपासले असता, मे. शिवराज ऑईल्स प्रा. लि. यांचे नावे घाऊक खाद्यतेल या वस्तुंच्या व्यापाराकरीता अनुज्ञाप्ती नसल्याचे आढळले. तसेच साठापुस्तक नसल्याचे आढळले. याबाबत अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे अधिक विचारणा केली असता, ते मागील ११ महिन्यांपासून सदरहू व्यवसाय करीत असून, ते करीत असलेल्या घाऊक वनस्पती व खाद्यतेलाच्या व्यवसायासाठी शिधावाटप यंत्रणेमार्फत देण्यात येणाऱ्या परवान्याची आवश्यकता असते, याबाबत त्यांना कसलीही कल्पना नव्हती, असे त्यांनी पंचांसमक्ष सांगितले. साधारणतः १५ दिवसांपूर्वी सहव्यापाऱ्यांमार्फत सदर व्यवसायास शिधावाटप यंत्रणेमार्फत देण्यात येणाऱ्या महाराष्ट्र शासनाचा परवाना आवश्यक असल्याचे त्यांना कळले होते. तरी सदर परवान्याची आवश्यकता असल्याची कल्पना नसल्या कारणास्तव सद्यःस्थितीपर्यंत परवाना मिळविण्यात आलेला नसल्याबाबत त्यांनी पंचांसमक्ष सांगितले. त्यानुसार नोंद घेवुन अधिकारी पंचांसह प्रत्यक्ष साठा मोजणी करायचे काम सुरु होते त्या ठिकाणी गेले. अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष साठा मोजणी करावयाच्या ठिकाणी पंचांसह जाऊन निपमभाई बी. शाह यांच्यासमक्ष गाळ्यातील व गोदामातील तसेच तळघरातील गोदामातील खाद्यतेलांच्या, वनस्पती तेलाच्या साठ्याची मोजदाद केली असता, खाद्यतेलाचा प्रत्यक्ष साठा २०९३१ लिटर व वनस्पतीचा साठा ४९१ लिटर असल्याचे आढळले. अधिकाऱ्यांनी निपमभाई बी. शाह यांनी उपरोक्त कथन केल्याप्रमाणे त्यांचा तसा लेखी जबाब पंचांसमक्ष नोंदविला. विनापरवाना घाऊक खाद्यतेल व्यवसाय करीत असल्याचे निदर्शनास आल्याने सदर गोदामातील खाद्यतेल तसेच वनस्पतीचा तेल साठा अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष जप्त केला. जप्त मुद्देमालाचा तपशिल खालील प्रमाणे,

<u>कार्यालयाच्या गाळ्यात असलेला साठा</u>

| खाद्यतेल प्रकार | नग | साठा | एकूण साठा | दर | एकूण अंदाजे किंमत |
|---|---|---|---|---|---|
| रुची गोल्ड पामोलिन | १ लि. X १० पिशवी | २४ बॉक्स | २४० लि. | ९०/- | २१,६००/- |
| रुची वनस्पती | १ लि. X १६ पिशवी | ११ बॉक्स | १७६ लि. | १००/- | १७,६००/- |
| रुची सोयाबीन | १ लि. X १२ पिशवी | १० बॉक्स | १२० लि. | १०६/- | १२,७२०/- |
| रायसिला राईस ब्रुम ऑईल | १५ लि. | १२ जार | १८० लि. | १८५०/- | २२,२००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| गोदरेज सनफ्लॉवर ऑईल | १५ लि. | ५ जार | ७५ लि. | १६२०/- | ८,१००/- |
| मोनोपॉली मस्टर्ड ऑईल | १५ कि.ग्रॅ. | ३९ डब्बे | ५८५ लि. | १९२०/- | ७४,८८०/- |
| रुची गोल्ड रिफाईन्ड पामोलिन | १५ लि. | २० डब्बे | ३०० लि. | १५४०/- | ३०,८००/- |
| रुची स्टार सोयाबीन रिफाईन्ड | १५ लि. | ३६ डब्बे | ५४० लि. | १६९०/- | ६०,८४०/- |
| गोकुळ मस्टर्ड ऑईल | १५ कि.ग्रॅ. | ३ डब्बे | ४५ लि. | १४००/- | ४,२००/- |
| सनरिच रिफाईन्ड सनफ्लॉवर | १ लि. X १२ पिशवी | २० बॉक्स | २४० लि. | १०९/- | २६,१६०/- |
| तिरुपती कॉटन ऑईल | १ लि. X १२ पिशवी | ८० बॉक्स | ९६० लि. | १००/- | ९६,०००/- |
| गोकुळ मस्टर्ड एक्सपेलर ऑईल | ५ लि. X ४ पिशवी | ४५ बॉक्स | ९०० लि. | ६०५/- | १,०८,९००/- |
| सनरिच रिफाईन्ड सनफ्लॉवर ऑईल | १५ लि. | ९६ टिन | १४४० लि. | १५८०/- | १,५१,६८०/- |
| मलया आर.बी.डी. रिफाईन्ड पाम ऑईल | १५ लि. | १० टिन | १५० लि. | १२००/- | १२,०००/- |
| अनमोल रिफाईन्ड कॉटन सिड ऑईल | १५ लि. | २४४ टिन | ३६६० लि. | १५००/- | ३,६६,०००/- |
| फॉर्च्यून रिफाईन्ड सनफ्लॉवर ऑईल | १५ लि. | ४१ टिन | ६१५ लि. | १७७०/- | ७२,५७०/- |
| तिरुपती कपासिया ऑईल | १५ लि. | ७५ टिन | ११२५ लि. | १३९०/- | १,०४,२५०/- |
| गोदरेज सनफ्लॉवर | १५ लि. | १२ डब्बे | १८० लि. | १६००/- | १९,२००/- |
| एकुण | | | | | १२,०९,७००/- |

## तळघरातील गोदामात असलेला साठा

| खाद्यतेल प्रकार | नग | साठा | एकूण साठा | दर | एकूण अंदाजे किंमत |
|---|---|---|---|---|---|
| गोकुळ मस्टर्ड एक्सपेलर ऑईल | १/२ लि. X २४ बाटली | ८३ बॉक्स | ९९६ लि. | ७५/- | १,४९,४००/- |
| मारुती लाईट एक्सपेलर ऑईल | १/२ लि. X २४ बाटली | ४५ बॉक्स | ५४० लि. | ९०/- | ९७,२००/- |
| मारुती लाईट एक्सपेलर ऑईल | १ लि. X १२ बाटली | ११ बॉक्स | १३२ लि. | १६५/- | २१,७८०/- |
| मारुती लाईट एक्सपेलर ऑईल | ५ लि. X ४ कॅन | १२ बॉक्स | २४० लि. | ७२०/- | ३४,५६०/- |
| सनरिच सनफ्लॉवर ऑईल | १५ लि. | १८ कॅन | २७० लि. | १५८०/- | २८,४४०/- |
| सनरिच सनफ्लॉवर ऑईल (डिलक्स) | १५ लि. | ५८ जार | ८७० लि. | १५८०/- | ९१,६४०/- |
| मलया आर.बी.डी. रिफाईन्ड पाम ऑईल | १५ लि. | ८६ डब्बे | १२९० लि. | १२००/- | १,०३,२००/- |
| गोकुळ कच्छी घाणी मस्टर्ड ऑईल | १/२ लि. X २४ बाटली | २९ बॉक्स | ३४८ लि. | ८५/- | ५९,१६०/- |
| रुचि स्टार सोयाबीन ऑईल | ५ लि X ४ कॅन | २ बॉक्स | ४० लि. | ५६०/- | ४,४८०/- |
| रुचि नं. १ वनस्पती | १५ लि. | २१ डब्बे | ३१५ लि. | १६९०/- | ३५,४९०/- |

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES ... FFICE

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मारुती लाईट शेंगदाण ऑईल | ५ लि. X ४ कॅन | ७३ बॉक्स | १४६० लि. | ७२०/- | २,१०,२४०/- |
| मारुती मस्टर्ड ऑईल | १५ कि. | ८६ डब्बे | १२९० लि. | १४००/- | १,२०,४००/- |
| झैका मस्टर्ड एक्सपेलर ऑईल | १५ लि. | १४० डब्बे | २१०० लि. | १३००/- | १,८२,०००/- |
| एकुण | | | | | ११,३७,९९०/- |

सदर तपासणीत एकूण रुपये २३,४७,६९०/- (अक्षरी तेवीस लाख सत्तेचाळीस हजार सहाशे नव्वद रुपये फक्त) एवढया किंमतीचा खाद्यतेल व वनस्पतीचा साठा पंचासमक्ष जप्त केला.

दरम्यान अधिकाऱ्यांनी बोरीवली पोलिस ठाणे (पं) येथे भ्रमणध्वनीवरुन संपर्क साधून घटनेची माहिती व वर्दी दिली. त्याप्रमाणे संबंधित पोलिस ठाण्यातुन अधिकारी/कर्मचारी उपस्थित झाले व त्यांना अधिकाऱ्यांनी कारवाईबद्दल माहिती दिली व त्यांचे समक्ष घटनास्थळी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल पुढील आदेशापर्यंत जैसे-थे ठेवण्याच्या अटींवर सुपूर्दनाम्याद्वारे निपमभाई बी. शाह, संचालक यांच्या सांगण्यानुसार जबाबदार व्यक्ती म्हणून श्री. चिराग एन. पटेल यांना सुपूर्द केला. तसेच सुपूर्दनाम्याद्वारे सुपूर्द केलेला साठा सुरक्षित व सुस्थितीत अबाधित ठेवण्याची संपूर्ण जबाबदारी श्री. चिराग एन. पटेल, संचालक यांची असुन तसे न केल्यास त्यांच्याविरुध्द कायेदशिर कारवाई केली जाईल याचीही जाणीव अधिकाऱ्यांनी त्यांना करुन दिली. जप्त करण्यात आलेला खाद्यतेल/वनस्पतीचा साठा हा हवाबंद डब्यामध्ये असल्याने त्याचे नमुने घेतलेले नाहीत.

अशाप्रकारे ताब्यात घेण्यात आलेले आरोपी निपमभाई बी. शाह हे विनापरवाना खाद्यतेल/वनस्पती यांची खरेदी, साठवणूक व विक्री करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याने, संबंधिताविरुध्द (१) महाराष्ट्र अनुसूचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ चे कलम ३, १०, ११(१), १३ व १४, (२) महाराष्ट्र अनुसूचित वस्तु किरकोळ व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९७९ चे कलम ३, १०(१), १२ व १३ तसेच (३) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ व १० चा भंग केल्याने त्यांचेविरुध्द बोरीवली पोलिस ठाणे, मुंबई येथे विशेष स्थानिक गुन्हा नोंद क्र. १७/२०१३, दिनांक १२/०३/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप, अंमलबजावणी यांनी वरील वाचावे क्र. १ मध्ये नमूद केलेल्या अहवालान्वये केली आहे. त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला जीवनावश्यक वस्तुंचा साठा

CONTROLLER OF RATIONING

सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक ०९/०४/२०१३ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ०९/०४/२०१३ रोजीच्या सुनावणीस मे. शिवराज ऑईल्स प्रा. लि. चे संचालक निपमभाई शाह व संचालक चिराग नारायण पटेल यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ३ अन्वये लेखी निवेदन सादर केले. सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी हे उपस्थित राहिले नाहीत.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयासाठी राखून ठेवण्यात आले.

**<u>युक्तिवाद</u> :-**

उपनियंत्रक शिधावाटप, ग परिमंडळ, कांदिवली यांचेकडून दिनांक ०६/०४/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अहवालात, मे. शिवराज ऑईल्स प्रा. लि. चे संचालक नावे श्री. निपमभाई बी. शाह व श्री. चिराग एन. पटेल यांचेकडे ग परिमंडळ अधिपत्त्याखालील अधिकारी/कर्मचारी यांनी मे. शिवराज ऑईल्स प्रा. लि. कंपनीच्या आस्थापना कार्यालय तसेच गोदामात दिलेल्या दिनांक १२/०३/२०१३ रोजीच्या भेटीवेळी महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ अंतर्गत आवश्यक ती अनुज्ञप्ती नसल्याचे आढळून आले आहे. सबब, मे. शिवराज ऑईल्स प्रा.लि. चे संचालक श्री. निपमभाई बी. शहा यांचे विरुध्द संबंधित पोलिस ठाणे येथे विशेष स्थानिक गुन्हा क्र. १७/२०१३ दाखल करुन सुमारे अंदाजित रक्कम ११,३७,९९०/- एवढा खाद्यतेल साठा सुपूर्तनामाद्वारे अन्य संचालक श्री. चिराग एन. पटेल यांचेकडे जैसे थे ठेवणेचा अटीवर सुपूर्द करण्यात आला आहे. सदरहू घटना झाल्यानंतर सुमारे ६ दिवसांनी म्हणजे दिनांक १८/०३/२०१३ रोजी मे. शिवराज ऑईल्स प्रा. लि. या व्यापारी नावाने संचालक श्री. निपमभाई बी. शहा व श्री. चिराग एन. पटेल यांनी घाऊक खाद्यतेल/वनस्पती करीता नवीन अनुज्ञप्तीसाठी विहीत नमुन्यात आवश्यक कागदपत्रासह अर्ज सादर केलेला आहे. सदरहू अर्ज आवश्यक त्या तपासणी व पडताळणी करीता संबंधित शिधावाटप कार्यालय क्र. ४३ ग, बोरीवली येथे दिनांक २१/०३/२०१३ रोजी पाठविण्यात आला आहे. तपासणी अहवाल अद्याप अप्राप्त आहे, असे नमूद केले आहे.

दिनांक ०९/०४/२०१३ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. शिवराज ऑईल्स प्रा. लि. चे संचालक निपमभाई शाह व संचालक चिराग नारायण पटेल यांनी सादर केलेल्या लेखी निवेदनात, दिनांक २६/०३/२०१३ रोजीच्या कारणे दाखवा नोटीस त्यांना प्राप्त असून त्या अनुसार पुढील प्रमाणे खुलासा सादर करीत आहेत. त्याने

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES ... FICE

खाद्यतेलाचा व्यावसाय दिनांक ०१/०४/२०१२ पासून सुरु केला आहे. सदरचा व्यवसाय सुरु करतेवेळी विविध शासकीय यंत्रणेचे आवश्यक ते परवाने १) गुमास्ता परवाना दिनांक ३१.१२.२०१३ पर्यंत वैध, २) अन्न सुरक्षा अंतर्गत प्रमाणपत्र दिनांक ३१.१२.२०१६ पर्यंत वैध, ३) व्हॅट टिन प्रमाणपत्र (V-TIN) वैधता संपेपर्यंत, ४) सी.एस.टी. प्रमाणपत्र (G.S.T.) वैधता संपेपर्यंत व ५) पंजीकरण प्रमाणपत्र हे वेळीच प्राप्त करुन घेतलेले आहे. सदरच्या प्रमाणपत्र छायांकित प्रत निवेदनासोबत जोडत आहे. त्याला माहित असलेले आवश्यक ते परवाने त्याने वेळीच प्राप्त करुन घेतले आहे. तथापी त्याला रेशनिंग विभाग लायसन्सची अवश्यकता असल्याबाबत कल्पना नसल्याने त्याने रेशनिंग विभाग लायसन्ससाठी अर्ज केला नाही. त्याच्यावर कायदेशिर कारवांई झाल्यानंतर आवश्यक ती माहिती मिळवून त्याने नवीन लायसन्स करीता अर्ज सादर केला आहे. केवळ माहिती नसल्याने त्यांच्याकडून गुन्हा घडल्याचे त्याला मान्य आहे. यामागे त्यांची गुन्हेगारी स्वरुपाची मानसिकता (criminal mentality) नाही, हेही आपणांस सविनय कळवू इच्छितो. यापुढे त्याच्याकडून कोणत्याही नियमाचा भंग न होता खाद्यतेलाच्या लायसन्समधील अटी व शर्तीचे पूर्ण पालन करण्याची हमी तो देत आहे. सबब, त्याला क्षमापित करुन त्याचा खुलासा मान्य करुन योग्य तो न्याय द्यावा अशी विनंती केली आहे.

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, बोरीवली पोलिस ठाणे, मुंबई यांचे दिनांक १५/०४/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, बोरीवली पोलिस ठाण्यात नमूद प्रमाणे गुन्हा दाखल झालेला असून त्यातील मे. शिवराज ऑईल्स प्रा.लि. चे संचालक निपमभाई बी. शहा व चिराग एन. पटेल हे आरोपी असून त्यांना सुनावणीस हजर राहण्याबाबत नोटीस बजावण्यात आली आहे, असे नमूद केले आहे.

**<u>निष्कर्ष</u> :-**

प्रस्तुत प्रकरणातील साठा मालक यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक १२/०३/२०१३ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार उपनियंत्रक शिधावाटप, ग परिमंडळ, कांदिवली यांचे अधिपत्याखालील अधिकारी/कर्मचारी पंचांसह मे. शिवराज ऑईल्स प्रा. लि., सी.टी.एस.क्र. ३७४/बी-१८, सत्यसाई कॉम्प्लेक्स जवळ, पद्मा नगर, चिकुवाडी, बोरीवली (प), मुंबई ४०० ०९२ या पत्त्यावर पोहचले. सदर पत्त्यावरील मे. शिवराज ऑईल्स प्रा. लि. यांच्या कार्यालयीन गाळयात

CONTROLLER OF RATIONING HEAD ... MUMB

प्रवेश करुन अधिकाऱ्यांनी उपस्थित निपमभाई बी. शाह, संचालक यांचेकडे आस्थापनेचे कागदपत्रे मागुन पंचांसमक्ष तपासले असता, मे. शिवराज ऑईल्स प्रा. लि. यांचे नावे घाऊक खाद्यतेल या वस्तुंच्या व्यापाराकरीता अनुज्ञप्ती नसल्याचे आढळले. तसेच साठापुस्तक नसल्याचे आढळले. याबाबत अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे अधिक विचारणा केली असता, ते मागील ११ महिन्यांपासून सदरहू व्यवसाय करीत असून, ते करीत असलेल्या घाऊक वनस्पती व खाद्यतेलाच्या व्यवसायासाठी शिधावाटप यंत्रणेमार्फत देण्यात येणाऱ्या परवान्याची आवश्यकता असते, याबाबत त्यांना कसलीही कल्पना नव्हती, असे त्यांनी पंचांसमक्ष सांगितले. अशाप्रकारे ताब्यात घेण्यात आलेले आरोपी निपमभाई बी. शाह हे विनापरवाना खाद्यतेल/वनस्पती यांची खरेदी, साठवणूक व विक्री करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याने, संबंधिताविरुध्द (१) महाराष्ट्र अनुसूचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ चे कलम ३, १०, ११(१), १३ व १४, (२) महाराष्ट्र अनुसूचित वस्तु किरकोळ व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९७९ चे कलम ३, १०(१), १२ व १३ तसेच (३) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ व १० चा भंग केल्याने त्यांचेविरुद्ध बोरीवली पोलिस ठाणे, मुंबई येथे विशेष स्थानिक गुन्हा नोंद क्र. १७/२०१३, दिनांक १२/०३/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन एकूण २३,४७,६९०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२३२० (ई), दिनांक २७/०९/२०१२ अन्वये डाळी/कडधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तूंवर दिनांक ३०/०९/२०१३ पर्यंत निर्बंध आहेत.

उपनियंत्रक शिधावाटप, ग परिमंडळ, कांदिवली यांनी सादर केलेल्या अहवालात, मे. शिवराज ऑईल्स प्रा. लि. या कंपनीच्या तपासणीच्या वेळी सदर कंपनीच्या नावे महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ अंतर्गत आवश्यक ती अनुज्ञप्ती नसल्याचे आढळून आल्याने मे. शिवराज ऑईल्स प्रा.लि. चे संचालकाविरुध्द संबंधित पोलिस ठाणे येथे गुन्हा दाखल करुन खाद्यतेल साठा जप्त करण्यात आला आहे. सदरहू घटना झाल्यानंतर सुमारे ६ दिवसांनी म्हणजे दिनांक १८/०३/२०१३ रोजी मे. शिवराज ऑईल्स प्रा. लि. या व्यापारी नावाने संचालक श्री. निपमभाई बी. शहा व श्री. चिराग एन. पटेल यांनी घाऊक खाद्यतेल/वनस्पती करीता नवीन अनुज्ञप्तीसाठी विहीत नमुन्यात आवश्यक कागदपत्रासह अर्ज सादर केलेला आहे. संदरहू अर्ज आवश्यक त्या तपासणी व पडताळणी करीता संबंधित शिधावाटप कार्यालय क्र. ४३ ग, बोरीवली येथे दिनांक २१/०३/२०१३ रोजी पाठविण्यात आल्याचे नमूद आहे.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES ... FICE

शासन परिपत्रक क्र. ईसीए-१०१०/४९५/प्र.क्र.९४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २०१० अन्वये केंद्र शासनाने तांदुळ, धान, डाळी, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठामर्यादेवर निर्बंध लागु केले आहेत. सबब, या वस्तुंचा व्यापार व साठवणुक करण्याकरीता संबंधित अनुज्ञप्ती प्राधिकाऱ्याकडून परवाना घेणे आवश्यक आहे. या वस्तुंच्या आयातदारांना साठामर्यादेतुन सुट देण्यात आलेली आहे. परंतु खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या निर्यातदारांना परवाना घेणे आवश्यक आहे. म्हणजेच डाळी/कडधान्य तसेच अन्नधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तुंचा व्यापार करणारे घाऊक व्यापारी व निर्यातदार यांना सदर अनुसुचित वस्तुंच्या खरेदी, साठवणूक व विक्री करीता महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश १९९८ अन्वये घाऊक परवाना घेण्याची आवश्यकता आहे.

महाराष्ट्र अनुसूचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश, १९९८ चे कलम २(e) अन्वये, "Dealer" means- a person engaged in the business of purchase, sale or storage for sale of any one or more of the scheduled commodities, असे नमूद आहे.

कलम २(f) अन्वये, "Edible oils" means- any oils used for cooking for human consumption and includes hydrogenated vegetable oils, असे नमूद आहे.

कलम २(z)(iv) अन्वये, "In relations to hydrogenated vegetable oil, a person who whether for commission, remuneration or otherwise carried on the business of purchase, sale of storage for sale of any hydrogenated vegetable oil or oils in quantities exceeding 150 kilograms at any one time to other dealers or other persons at wholesale rate, असे नमूद आहे.

कलम २(z)(vi) अन्वये, "In relations to any edible oilseeds or edible oil a person who, whether for commission, remuneration or otherwise carries on the business of purchase, sale or storage for sale edible oilseeds or edible oils in quantities exceeding twenty quintals at any one time to other dealers or other persons at wholesale rates and includes a commission agent or a sub-wholesalers, who holds stocks of edible oilseeds or edible oils in the conduct of his business", असे नमूद आहे.

कलम २(x) अन्वये, "schedule commodity" means- any of the commodities specified in schedule appended to this order, असे नमूद आहे.

कलम २(x) अन्वये नमुद अनुसुचित वस्तुंच्या यादीमधील अनुक्रमांक ४ अन्वये खाद्यतेलबियांची यादी विषद केली असुन त्यामध्ये, Oilseeds- (i) Groundnut (ii) Sunflower or Kardi (iii) Sesamum or Til (iv) Cotton seed (v) Sunflower, (vi) Mustard, (vii) Linseed (viii) Soyabean, (ix) Copra, (x) Khurasani and Nigerseed, असे स्पष्ट नमुद आहे.

कलम २(x) अन्वये नमुद अनुसुचित वस्तुंच्या यादीमधील अनुक्रमांक ५ अन्वये, Oils- The palmolein oil, Rapeseed oil or any other oils prepared from oil seeds specified above (whether raw, filtered or refined), असे स्पष्ट नमुद आहे.

कलम ३(b) अन्वये, - No person shall carry on business as a wholesale dealer in any one or more of the scheduled commodities except in accordance with the terms and conditions of all licence under this order, असे नमुद आहे.

उपरोक्त नमुद आदेशामधील तरतूदींचे अवलोकन करता, मे. शिवराज ऑईल्स प्रा. लि. या कंपनीने घटनास्थळी असलेल्या गाळ्यात विविध खाद्यतेलाचा २०९३१ लिटर व वनस्पतीचा ४९१ लिटर विविध क्षमतेच्या पॅकिंगमधील साठा हा साठवणुक केला असल्याने नमुद कंपनीस वरील नमुद आदेशाच्या कलम २(z)(iv) अन्वये वनस्पतीसाठी तसेच कलम २(z)(vi) अन्वये खाद्यतेलासाठी घाऊक परवाना धारण करणे बंधनकारक आहे. तसेच कलम ३(b) अन्वये नमुद बाबींचे अवलोकन करता, केवळ कमीशन एजन्ट जे घाऊक व्यापारी अथवा उत्पादक यांच्यावतीने व्यवसायात सहभागी असल्यास परंतु ते कोणताही साठा संपादन करुन साठवणुक करीत नसल्यास त्यांना नमुद आदेशामधील तरतुदींच्या अनुषंगाने घाऊक परवाना घेण्यापासुन सुट देण्यात आल्याचे नमुद आहे. तसेच कलम २(x) अन्वये नमूद खाद्यतेलबियांचा साठा व त्यापासुन तयार करण्यात आलेला खाद्यतेलाचा साठा हा अनुसुचित वस्तुंच्या यादीमध्ये समाविष्ट असल्याची बाब प्रकर्षाने नमुद करावीशी वाटते. सदर प्रकरणी मे. शिवराज ऑईल्स प्रा. लि. या कंपनीने स्थानिक बाजारपेठेतुन विविध प्रकारचा खाद्यतेल व वनस्पतीचा विविध क्षमतेच्या पॅकींगमधील साठा विक्री करण्यासाठी त्यांनी नमुद गाळ्यात साठवणुक केला असल्याने त्यांना महाराष्ट्र अनुसूचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश, १९९८ या आदेशान्वये खाद्यतेल व वनस्पतीच्या खरेदी, साठवणुक व विक्री करीता घाऊक परवाना धारण करणे आवश्यक आहे.

सदर गुन्हा नोंद प्रकरणी मे. शिवराज ऑईल्स प्रा. लि. चे संचालक निपमभाई बी. शाह यांनी घटनास्थळी दिलेल्या जबाबात सदरचा घाऊक व्यवसाय मागील ११ महिन्यांपासून करीत असल्याचे सांगून वनस्पती व

खाद्यतेलाच्या व्यवसायासाठी शिधावाटप यंत्रणेमार्फत देण्यात येणाऱ्या परवान्याची आवश्यकता असते याबाबत त्यांना कसलीही कल्पना नसल्याचे सांगितले. तसेच मे. शिवराज ऑईल्स प्रा. लि. चे संचालक निपमभाई शाह व संचालक चिराग नारायण पटेल यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, त्यांनी खाद्यतेलाचा व्यावसाय दिनांक ०१/०४/२०१२ पासून सुरु केला असून सदरचा व्यवसाय सुरु करतेवेळी विविध शासकीय यंत्रणेचे आवश्यक ते परवाने हे वेळीच प्राप्त करुन घेतलेले आहे. तथापी त्यांना रेशनिंग विभाग लायसन्सची अवश्यकता असल्याबाबत कल्पना नसल्याने त्याने रेशनिंग विभाग लायसन्ससाठी अर्ज केला नाही. त्याच्यावर कायदेशिर कारवाई झाल्यानंतर आवश्यक ती माहिती मिळवून त्याने नवीन लायसन्स करीता अर्ज सादर केला आहे. केवळ माहिती नसल्याने त्याच्याकडून गुन्हा घडल्याचे त्याला मान्य असल्याचे सांगितले आहे. उपरोक्त विवेचन लक्षात घेता, मे. शिवराज ऑईल्स प्रा. लि. या कंपनीच्या संचालकांनीं इतर प्राधिकरणाकडून आवश्यक असलेले परवाने/प्रमाणपत्र काळजीपुर्वकरित्या प्राप्त करुन घेतल्याचे दिसुन येते. तथापी, सुमारे वर्षभरापासुन खाद्यतेल/वनस्पती या अनुसूचित वस्तूंचा घाऊक व्यवसाय करीत असताना त्यांनी किरकोळ वितरकांना स्थानिक बाजारपेठेत खाद्यतेलाचा साठा विक्री करताना महाराष्ट्र अनुसूचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ अन्वये परवाना धारण करणे आवश्यक असल्याची बाब त्यांना ज्ञात नसल्याचे सांगुन त्यांनी या कार्यालयाची पर्यायाने शासनाची दिशाभुल करण्याचा प्रयत्न केला आहे.

मे. शिवराज ऑईल्स प्रा. लि. या कंपनीचा घटनास्थळी खाद्यतेल व वनस्पतीचा व्यवसाय कार्यरत आहे. सदर कंपनीत विविध खाद्यतेल व वनस्पतीचा पॅकबंद डब्यांमधील साठ्याची खरेदी करुन तद्नंतर घाऊक विक्री केली जात असल्याचे दिसुन येते. मे. शिवराज ऑईल्स प्रा. लि. या कंपनीचे संचालक निपमभाई बी. शाह यांनी पंचांसमक्ष दिलेल्या जबाबात त्यांच्या कंपनीच्या नावे खाद्यतेल व वनस्पतीच्या खरेदी, साठवणूक व विक्रीबाबतचा आवश्यक असलेला महाराष्ट्र अनुसूचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ अन्वये परवाना नसल्याचे तसेच सदरचा परवाना मिळण्याकरीता संबंधित अनुज्ञप्ती प्राधिकारी यांचेकडे तपासणीच्या दिवसापर्यंत अर्जही केला नसल्याचे कबुल केले आहे. सदर प्रकरणी पथकाने तपासणीच्यावेळी विविध प्रकारच्या खाद्यतेलाचा २०९३१ लिटर म्हणजेच १९०.४७ क्विंटल व वनस्पतीचा ४९१ लिटर म्हणजेच ४४६.८१ किलो ग्रॅम साठा जप्त केला आहे. सदर साठ्यासंदर्भात संचालक यांनी घटनास्थळी तसेच सुनावणीच्यावेळी कोणतीही खरेदी बिले सादर केले नाही. त्यामुळे मे. शिवराज ऑईल्स प्रा. लि. या कंपनीने नमुद गाळ्यात साठवणुक केलेला खाद्यतेल व वनस्पतीचा साठा हा विना खरेदी बिलांचा खरेदी व साठवणुक करुन त्यांचा सुरु असलेला व्यवसाय हा पुर्णपणे बेकायदेशीर व

CONTROLLER OF RATIONING HEAD MUMBAI

विनापरवाना असल्याचे सिध्द होत आहे. मे. शिवराज ऑईल्स प्रा. लि. या कंपनीस कलम २(z)(iv) अन्वये वनस्पतीसाठी १५० किलो ग्रॅम तसेच कलम २(z)(vi) अन्वये खाद्यतेलासाठी २० क्विंटल पर्यंत विनापरवाना साठवणूक करण्याची मुभा आहे. सबब, मे. शिवराज ऑईल्स प्रा. लि. यांचा जप्त करण्यात आलेल्या विविध प्रकारच्या पॅकबंद डब्यांमधील एकूण १९०.४७ क्विंटल खाद्यतेलाच्या साठ्यापैकी २० क्विंटल तसेच एकूण ४४६.८१ किलो ग्रॅम वनस्पतीच्या साठ्यापैकी १५० किलो ग्रॅम साठा हा मुक्त करण्याच्या तसेच उर्वरीत विनापरवाना असलेला १७०.४७ क्विंटल खाद्यतेलाचा व २९६.८१ किलो ग्रॅम वनस्पतीचा साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये बोरीवली पोलिस ठाणे, मुंबई येथे विशेष स्थानिक गुन्हा नोंद क्र. १७/२०१३, दिनांक १२/०३/२०१३ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

**<u>आदेश</u> :-**

१) प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या विविध प्रकारच्या पॅकबंद डब्यांमधील एकूण १९०.४७ क्विंटल खाद्यतेलाच्या साठ्यापैकी २० क्विंटल, तसेच एकूण ४४६.८१ किलो ग्रॅम वनस्पतीच्या साठ्यापैकी १५० किलो ग्रॅम साठा हा बंधपत्र घेऊन मुक्त करण्यात यावा.

२) उपरोक्त प्रमाणे २० क्विंटल खाद्यतेलाचा व १५० किलो ग्रॅम वनस्पतीचा साठा मुक्त केल्यानंतर उर्वरीत १७०.४७ क्विंटल खाद्यतेलाचा व २९६.८१ किलो ग्रॅम वनस्पतीचा संपूर्ण साठा हा शासनजमा करण्यात यावा.

३) सदर शासनजमा करण्यात आलेला १७०.४७ क्विंटल खाद्यतेलाचा व २९६.८१ किलो ग्रॅम वनस्पतीचा साठा पोलिसांनी उपनियंत्रक शिधावाटप, ग परिमंडळ, कांदिवली यांचे मदतीने वैध परवानाधारकास प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food,

0012

Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मे. शिवराज ऑईल्स प्रा. लि. चे संचालक निपमभाई बी. शाह

२) मे. शिवराज ऑईल्स प्रा. लि. चे संचालक चिराग एन. पटेल
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, बोरीवली पोलिस ठाणे, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, बोरीवली पोलिस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.

२) उपनियंत्रक शिधावाटप, ग परिमंडळ, कांदिवली यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

४) कार्यासन अधिकारी, का.क्र. ५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव अग्रेषित.

५) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.